# यावल महाविद्यालयात विज्ञान दिन संपन्न

यावल (प्रतिनिधी) येथील ज.जि.म.वि.प्र.सह.समाज संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात "*विज्ञान दिन"* प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकताच संपन्न झाला.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार होते तर प्रमुख वक्ते पदार्थविज्ञान विभागाचे प्रा. डॉ. जी. भंगाळे होते. कार्यक्रमासाठी मयूर सोनवणे उपस्थित होते.

सुरुवातीला नोबेल पारितोषिक विजेते व भारतरत्न डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमे चे पूजन व अभिवादन करण्यात आले.

प्रा. एम. डी. खैरनार यांनी डॉ. सी. व्ही. रमण यांनी केलेल्या संशोधनाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देऊन, विद्यार्थ्यांनी जीवनात संशोधन वृत्ती जोपासली पाहिजे व जीवनात येणाऱ्या विविध समस्या सोडविल्या पाहिजेत, 'समस्या ही संशोधनाची जननी आहे' असे प्रतिपादन केले. प्रा. डॉ.एच. जी भंगाळे यांनी म्हटले की विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग हा नेहमी चांगल्या कार्यासाठी करावा त्यामुळे भविष्यात सकारात्मक परिणाम आपल्याला दिसून येतात. यावेळी कु. चारुलता पाटील व कु. विश्वदेवी भालेराव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस. आर. गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. डॉ.आर. डी. पवार यांनी मानले.

**कार्यक्रम यशस्वितेसाठी युगल पाटील  अनिकेत पवार, ज्ञानेश्वर कोळी यांनी सहकार्य केले.**

# यावल महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा



यावल : येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'विज्ञान दिन' प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकताच झाला.अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार होते तर प्रमुख वक्ते पदार्थविज्ञान विभागाचे प्रा. डॉ. जी. भंगाळे होते. कार्यक्रमासाठी मयूर सोनवणे उपस्थित होते. सुरुवातीला नोबेल पारितोषिक विजेते व भारतरत्न डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमे चे पूजन व अभिवादन करण्यात आले.

सूत्रसंचालन प्रा. एस. आर. गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. डॉ.आर. डी. पवार यांनी मानले.यशस्वितेसाठी युगल पाटील अनिकेत पवार, ज्ञानेश्वर कोळी यांनी सहकार्य केले.